



रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर

ता. पलूस, जि. सांगली

दि. ५ मार्च २०२१

## मराठी विभाग

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त

# हास्ययात्रा एकपात्री विनोदी कार्यक्रम

## अहवाल

शुक्रवार, दिनांक ५ मार्च २०२१ रोजी मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून 'हास्ययात्रा-एकपात्री विनोदी कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध साहित्यिक आणि कथाकथनकार शरद जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

जीवनातील खरा आनंद शोधण्यासाठी माणसाने स्वत:ला मातृभाषेबरोबर जोडून घेतले पाहिजे. भाषेतील छोट्यामोठ्या गमतीजमतीतूनच माणसाला सात्त्विक आनंद मिळू शकतो, असे प्रतिपादन हास्ययात्राकार शरद जाधव यांनी केले. यावेळी अध्यक्षीय मनोगतातून डॉ. एल. डी. कदम यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेची महती सांगितली.तसेच मराठी भाषेचे संवर्धन झाले पाहिजे, त्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाच्या दृकश्राव्य कक्षामध्ये आयोजित करण्यात आला होता. कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सदर कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय प्रा. तेजस चव्हाण यांनी केला. आभार विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने, तर सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले.

**निष्पत्ती :** विद्यार्थ्यांना मातृभाषेचे महत्त्व समजले.

**लाभार्थी :** विद्यार्थी ६१, सेवकवृंद - १०





मराठी विभागप्रमुख
**मराठी विभाग प्रमुख,**
**डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,**
**रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.**

प्राचार्य
**प्राचार्य,**
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'हास्ययात्रा' कार्यक्रमातील काही क्षणचित्रे










